# जागतिकीकरण आणि आंबेडकरवादी कविता

**डॉ. रामलाल चौधरी**
मराठी विभाग प्रमुख
कला व वाणिज्य महाविद्यालय,
पेट्रोल पंप, जवाहर नगर. भंडारा.
७०३८०४७९८६
drramrupchaudhari@gmail.com

**सारांश:**

उद्‌भवणाऱ्या प्रत्येक समस्येचे समाधान करण्याची वृत्ती मानवाची असल्यामुळे काळातीत सूज्ञ माणूस हातावर हात ठेवून वा डोळे मिटून शांत बसला नाही. वेळोवेळी उद्‌भवणाऱ्या प्रत्येक समस्येचे निराकरण करण्याकरिता तडजोड केली. जुन्याचा बोध आणि नव्याचा शोध या उक्तीप्रमाणे जाणकारांनी प्राचीन विशेषत: धार्मिक साहित्यातील वैश्वीकरणाची संकल्पना पुढे आणली. वैश्वीकरणाची म्हणजेच आधुनिकतेनुसार जागतिकीकरणाची संकल्पना पुढे येऊ लागली. ही संकल्पना पुढे येतांनी मात्र नव्या रुपाने आलेली आहे. प्राचीन साहित्यातून विश्व कल्याणाची जी रूढ संकल्पना आर्थिकतेपेक्षा मानवतेला जास्त महत्व देणारी आहे. परंतु आताची जागतिकीकरणाची जी संकल्पना रूढ होऊ पाहते आहे ती फक्त आणि फक्त आर्थिकतेशी संबंध ठेवणारी आहे. राष्ट्राराष्ट्रात मुक्त व्यापार चालावा म्हणजे एका राष्ट्रातील उत्पादित वस्तू दुसऱ्या राष्ट्रात सहज विकता येईल, चलनी व्यवहार करता येईल अशा उद्देशाने जगातील काही राष्ट्रे समोरासमोर आली.

कवितेच्या रुपाने आंबेडकरवादी कवी उत्तम कांबळे भाकरीचे महत्व मोठया पोटतिडकीने विशद करतो आहे. भाकर काय चीज आहे, त्यालाच कळते ज्याला भूक लागल्यावर वेळीच घ्यायाला भाकर मिळत नाही. भाकर पोटाची ठिणगी भरण्यासाठी मानसाला कधी–कधी माणसातून उठवून टाकते ती भाकर. मानसाचा मान खाली करते ती भाकर. आपल्यापासून परकी करते ती भाकर. या बाजारीकरणाच्या नादात सर्वसामान्य जनता फार होरफळल्या गेली. बाजारीकरणामुळे भांडवलदारांचा चंगळवाद सुरू झाला. त्यांची एक हाती मक्तेदारी सुरू झाली. गरीब, दलित नागवला गेला. जातीपातीचा भेद कमी झाला पण गरीब–श्रीमंतीची दरी खूप खोल होत गेली. जागतिकीकरणाने सर्वसामान्यांचे कल्याण होण्याचे भाकीत मात्र भाकीत ठरले. कवीचा देशावरील नि:सिम प्रेम व अतूट श्रद्धाभाव आणि पूर्ण विश्वास असल्याची भावना दिसून येते. म्हणून ते गावकऱ्यांना उद्‌देशून म्हणतात, हे माझ्या प्रिय गावकऱ्यांनो तुम्ही कसल्या मानवेत्तर शक्तीचा विचार करीत बसलात जे धावत येऊन तुमच्या सर्व समस्यांचे सहज समाधान करून टाकील! असे जर वाटत असेल तर तो तुमचा केवळ भ्रम आहे, हे लक्षात असू द्या. जे करायचे आहे ते आपणासच करावे लागणार आहे. कारण गावाच्या विकासाची आकाशवाणी होणार नाही. तहानल्या शेतीला कोणी पाणी पाजणार नाही. गावाच्या गावपणासाठी आपल्यालाच निर्धाराचा पहाड व्हावे लागणार आहे. कारण जगाच्या दुखण्यावरचे औषधच भारत आहे. व्यापाराच्या दृष्टीने एक नवीन करार करण्यात आला आणि तो करार म्हणजेच जागतिकीकरण होय.

**पार्श्वभूमी :—**

जागतिकीकरण म्हणजे काय हे समजून घेताना थोडा खोलवर जाऊन विचार करावा लागेल. तसे झाले नाही तर नेमका अर्थ बाजूला राहून चुकीचाच अर्थ लागण्याची दाट शक्यता राहील. समाजात, देशात अर्थातच जगात कुठलीही एखादी नवीन गोष्ट नव्याने आली की त्याबद्दलची उत्सुकता जितकी असते, त्याबद्दलची भीतीही तितकीच असते. कधी—कधी काही घटकातील, समुहातील लोक उगीच भीती, विरोध करतात. उदाहरणादाखल लैंगिक शिक्षण, नोटबंदी, कोरोना वरील रोगप्रतिकार शक्ती वाढवणारी लस या सारखे किती तरी उदाहरणे आपल्याला देता येतील. एखाद्या नवीन धोरणाविषयी एखादी बातमी झळकताच समाजातील काही स्वत:ला अधिक शहाणे समजणारे, एखाद्या पक्षाची वेठबिगारी करणारे आपल्या खाजगी स्वार्थासाठी सत्ताधिसांची मर्जी राखणारे चापलूसगीर सिमेच्या पलीकडे जाऊन काहूर माजवतात, कडाडून विरोध करतात. विरोध करायचा पण कशासाठी? कोणासाठी? कोणत्या पातळीवर? कोणी करायचा? अशा अनेक प्रश्नांना वाचा फुटल्याशिवाय राहत नाही. कधी—कधी कशासाठी विरोध करीत आहोत हेही विरोध करणाऱ्यांना अवगत नसल्याचेही बरेचदा आपण बघितले आहे, म्हणजे फक्त विरोधाकरिता विरोध अशीच संकल्पना आपल्यात रूजल्याची भावना दिसून येते. आपला मराठी माणूसही यात काही कमी नाही. या बाबीला समाज माध्यम फार प्रमाणात जबाबदार असते. कारण समाज माध्यमाची भूमिका ही धोरण आखणारी यंत्रणा आणि समाज या दोघातील दुव्याची असते, त्याला दोघांमधला समन्वय साधता आला पाहिजेत, परंतु प्रत्यक्षात तस घडताना दिसून येत नाही. यातच खऱ्या अर्थाने समाजाची दिशाभूल होत असते.

**जागतिकीकरण की बाजारीकरण :—**

जागतिकीकरणाचे बरेवाईट परिणाम मानवी जीवनाबरोबर इतर सर्वच क्षेत्रावर कमी—अधिक प्रमाणात जाणवणार यात यत्किंचितही संशय नाही. जागतिकीकरणाच्या अंधाधुंद लाटेत फक्त आर्थिकच क्षेत्रात बरावाईट परिणाम होईल असे जर कोणी गृहीत धरीत असेल तर ती भयानक असी चूक समजावी लागेल. जागतिकीकरणाच्या सुनामीत सर्वांचा टिकाव लागेलच असे म्हणताच येणार नाही. जे राष्ट्र प्रगत आणि शक्तीशाली आहेत, जे नवनवीन तंत्रज्ञानाने परिपूर्ण आहेत, संरक्षणाच्या दृष्टीने सक्षम आहेत, त्यांच्या पुढे जे कमकुवत आहेत, आर्थिक दृष्ट्या सबळ नाहीत, तंत्रज्ञानात फार मागासलेले आहेत अशा देशांची फरफट झाल्याशिवाय राहणार नाही. 'बळी तो कान पिळी' असी अवस्था निर्माण होईल. माणूस पैशासाठी स्वत:चा इमान विकेल. भ्रष्टाचार हेच शिष्टाचार होईल. 'ना बाप बडा ना भैया सबसे बडा रूपया' असी मानवाची अवस्था झालेली असेल. जागतिकीकरणाचे बरेवाईट परिणाम मानवाच्या जीवनमानावर जाणवत असून त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रभाव मोठ्या प्रमाणात साहित्य क्षेत्रावर जाणवतो आहे. जागतिक साहित्याचे आदान—प्रदान सहज सोपे होऊन मोठ्या प्रमाणावर होऊ घातले आहे. त्यामुळे संबंधित भाषेतील साहित्य समृद्ध होते यात काही शंका नाही. परंतु भाषा हे संस्कृतीचे अभिन्न अंग आहे. मग भाषा बदलली की आपोआप संस्कृती बदलत असते. संस्कृती बदलाचा हा एक मोठा धोका असतो. 'अनेकतेत एकता असी आपली संस्कृती' आहे आणि हीच तर खरी महानता आहे. ती आजच्या घडीला साबूत टिकवून ठेवण्याची खरी जबाबदारी सूज्ञ जनांची आहे याचा अर्थ आपसुकच ती साहित्य निर्मात्यांची आहे असे म्हणने वावगे ठरणार नाही असे माझे मत आहे. कारण साहित्य हे समाजाचा आरसा असतो. समाजाची प्रतिमा साहित्यकृतीत उमटत असते, आणि साहित्यकृतीचा प्रभाव समाज मनपटलावर उमटत असतो. या गोष्टीचे जर आपण भान ठेवले तर या

जागतिकीकरणाच्या सुनामीत आपला टिकाव नक्कीच लागल्याशिवाय राहणार नाही, यात कुठेही शंकेला वाव नाही. देशीवादाचे पुरस्कर्ते डॉ. भालचंद्र नेमाडे आर्वजून सांगतात, देशी असणे म्हणजे या एकंदर भूमित्वाचे भान त्यातील सर्व जाती, वंशाचे, समूह, संप्रदाय, धर्म परंपरा, स्थळकाळाचे उभे आडवे छेद या सर्वासकट येणारे एकजीनसीपणाचे भान होय.

जागतिकीकरणामुळे सगळ्याच गोष्टीचे बाजारीकरण होऊ लागले. जसे वस्तुंचे बाजारीकरण, सेवांचे बाजारीकरणाबरोबर संस्कृतीचे बाजारीकरण मानवी जीवनमानाचे बाजारीकरण सुद्धा या जागतिकीकरणामुळे होऊ लागले. जागतिकीकरणातील सर्वात मोठा आणि भयंकर दोष म्हणजे पैसा झाला मोठा ही जगातील सर्वच क्षेत्रातील मानसाची वृत्ती होय. मानवी जीवन स्वार्थाने बोकाळला आहे. परस्परातील संबंध संपुष्टात येऊ पाहत आहेत. एका बाजुला यंत्रामुळे जगाचे अंतर कमी आणि व्यवहार फार सोपे झाले आहे. परंतु तितकेच गुंतागुंतीचे, फसवेगिरीचे, व बेईमानीचे झाले आहे. माणूस आपले पणाची, स्वार्थी पणाची वृत्ती स्वीकारत असल्याचे दिसून येते आहे.

**जागतिकीकरणाचा भारतातील शिरकाव :—**

आंतरदेशीय व्यापार प्राचीन काळात सुद्धा अस्तित्वात होता. याचे दाखले प्राचीन साहित्यातून बघायला मिळतात. तत्कालिन आंतरदेशीय, (वैश्वीकरण) व्यापार आणि आजचे आंतरराष्ट्रीय (जागतिकीकरण) व्यापार यात शब्द समानार्थी असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात जमीन आसमानाचा अंतर आहे. प्राचीन काळातील लोकांची संस्कृती सुसंस्कृत, सदृश्य आणि संपन्न होती. मानवी गरजांची पूर्तता करणे हाच एकमेव उद्दिष्ट होता, तसा आता राहिलेला नाही. जागतिकीकरणामुळे मानवाची कल्याणाची मुळ संकल्पना बाजूला राहून बाजार पेठेची गरज पूर्ण करण्याची म्हणजेच चंगळवादाची संकल्पना रूढ झाली आहे. प्रगत देशांच्या चंगळवादाच्या लाटेत प्रगती पथावर धाऊ पाहणाच भारतासारख्या देशांना आपले अस्तित्व सिद्ध करण्याकरिता तारेवरची कसरत करावी लागत आहे. देशाचे हित जोपासत असता देशातीलच काही कुटील, देशहित विरोधी मनोवृत्तीचे महाभाग आपल्या निजी स्वार्थापोटी नको त्या गोष्टीचा फाजूल काहूर माजवतात. ज्याने देश हित कार्यात बाधा निर्माण होत असते. हा एक यांत्रिक युगातील जागतिकीकरणाचा दोष मानावा लागेल.

जगात जागतिकीकरणाचा उगम १९३० मध्ये झाला असला तरी भारतात त्याचा शिरकाव १९९१ मध्ये झााला. मा. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे तेव्हा अर्थमंत्री या पदावर कार्यरत होते. नवीन आर्थिक धोरण या नावाने भारतीय संसदेने नवीन आर्थिक धोरणाची स्वीकृती दिली. त्याचेच परिणाम की भारतात उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण असे तीन करण भारतात मुक्तपणाने संचार करू लागले. म्हणजेच तेव्हा पासून भारताने मुक्त अर्थ व्यवस्थेचा स्वीकार करून आपल्या संविधानाने दिलेली समाजवादाची अर्थ व्यवस्था संपुष्टात आणली. जेव्हा मुक्त अर्थ व्यवस्थेचा हुंकार भारतीय समाजाने ऐकला तेव्हा त्याचा कडाडून विरोध करण्यात आला. मुक्त अर्थ व्यवस्थेचा विरोध होतो आहे हे लक्षात येताच धुरिनांकडून भारतीय बहुसंख्य समाजाची दिशाभूल करण्यात आली. मुक्त बाजार पेठेचा खरा चेहरा भारतीय बहुसंख्य समाजापुढे आलाच नाही, नाही मुद्दाम येऊ दिला नाही. उलट त्याचे नको ते फायदे सांगण्यात ही संधीसाधू मंडळी मोठ्या खुबीने यशस्वी झाली. मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये सर्वसामान्य मानसाच्या हिताचा विचार केला आहे?, भारत हा शेतकऱ्यांचा देश म्हणून यात शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यात आले आहेत?, भारतात कामगार बहुप्रमाणात म्हणून रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्वीकारली गेली

आहे? अशा प्रकारे अनेक भूलथापा देण्याचे काम सर्वोपरी करण्यात आले व आपल्या देशात मुक्त अर्थ व्यवस्था नांदू लागली.

**आंबेडकरवादी कविता :—**

भाकरी—
छिनाल असते
घोडयाची लगाम असते
टाटाची गुलाम असते
भाकरी—
मारवाडयाचं माप असते
पोटात लपलेलं पाप असते
युगायुगाचा शाप असते.
भाकरी—
इतिहास असते आणि भूगोलही
गळ्यातला फास आणि श्वासही
कोडं भरलेला आकास आणि भासही
भाकरी—
साक्षीदार असते धर्मयुद्धाची नि कर्मयुद्धाची
कागदावर अलगद येणा—या कवितांची
उन कवितांत पेरलेल्या स्फोटांचीही.[१]

या कवितेच्या रुपाने आंबेडकरवादी कवी उत्तम कांबळे भाकरीचे महत्व मोठया पोटतिडकीने विशद करतो आहे. भाकर काय चीज आहे, त्यालाच कळते ज्याला भूक लागल्यावर वेळीच घ्यायाला भाकर मिळत नाही. भाकर पोटाची ठिणगी भरण्यासाठी मानसाला कधी—कधी माणसातून उठवून टाकते ती भाकर. मानसाचा मान खाली करते ती भाकर. आपल्यापासून परकी करते ती भाकर. या बाजारीकरणाच्या नादात सर्वसामान्य जनता फार होरफळल्या गेली. बाजारीकरणामुळे भांडवलदारांचा चंगळवाद सुरू झाला. त्यांची एक हाती मक्तेदारी सुरू झाली. गरीब, दलित नागवला गेला. जातीपातीचा भेद कमी झाला पण गरीब—श्रीमंतीची दरी खूप खोल होत गेली. जागतिकीकरणाने सर्वसामान्यांचे कल्याण होण्याचे भाकीत मात्र भाकीत ठरले.

माणसाच्या प्रदेशातून
भुकेला हद्दपार केले.
त्या तमाम कष्टवीरांनो
चला, आपणच आता
आभाळभर होऊ
अन् जगातल्या मानवी दु:खालाच
आपल्या कवेत घेऊ,[२]

कवी हेमंतकुमार कांबळे हे आपल्या 'गाव' या दीर्घ कवितेत मानसाच्या जीवनाची व्यथा मांडतात. राबराब राबणारा, रात्रंदिवस कष्ट उपसणारा मात्र पोटभर अन्नासाठी वनवन करतो. त्याच्या श्रमाचा उचीत मोबदला त्यालाच वेळेवर मिळेणासा होतो. रात्री ढकाढका पाणी पिऊन उजाळणाऱ्या दिवसाची वाट पाहत झोपी जातो. करिताच कवी या ठिकाणी तमाम कामकरी, कष्टकरी वीरांना एक प्रकारे आवाहन करतात. आता थांबून, वाट बघून प्रश्न मिटणार नाही, उलट अजून गुंतागुंतीचे, जटील होतील. चला आता आपणच आभाळभर होऊन माणसाच्या प्रदेशातून भुकेलाच हद्दपार करू अशी अभिलाषा कवी या ठिकाणी व्यक्त करतात.

माझ्या गावकऱ्यांनो
तुम्ही कसल्या मानवेत्तर
शक्तीचा विचार करत आहे,
अहो, जगाच्या दुखण्यावरचे
औषधच 'भारत' आहे.[३]

कवीचा देशावरील नि:सिम प्रेम व अतूट श्रद्धाभाव आणि पूर्ण विश्वास असल्याची भावना दिसून येते. म्हणून ते गावकऱ्यांना उद्देसून म्हणतात, हे माझ्या प्रिय गावकऱ्यांनो तुम्ही कसल्या मानवेत्तर शक्तीचा विचार करीत बसलात जे धावत येऊन तुमच्या सर्व समस्यांचे सहज समाधान करून टाकील! असे जर वाटत असेल तर तो तुमचा केवळ भ्रम आहे, हे लक्षात असू द्या. जे करायचे आहे ते आपणासच करावे लागणार आहे. कारण गावाच्या विकासाची आकाशवाणी होणार नाही. तहानल्या शेतीला कोणी पाणी पाजणार नाही. गावाच्या गावपणासाठी आपल्यालाच निर्धाराचा पहाड व्हावे लागणार आहे. कारण जगाच्या दुखण्यावरचे औषधच भारत आहे. कवी हेमंतकुमार कांबळे या ठिकाणी भविष्याचा वेध घेतानी दिसतात. सध्या जगात कोरोना नावाच्या रोगाने चांगलाच थैमान मांडला आहे. इ.स. २०२० ची सुरुवातच जनुकाही कोरोनाने झाली आणि काही काळासाठी संपूर्ण जग स्तब्ध झाला. जिथल्या तिथं थांबला. आज वर्ष दीडवर्ष लोटूनही जग पूर्ववत झालेला नाही, परंतु अशात कोरोनावर मात करणारे औषध मात्र भारताने शोधून काढले आणि जगाच्या दुखण्याचे औषध ठरले. खरे आहे आज घडीला जगाच्या दुखण्यावरचे औषध भारत आहे, जगातील अनेक देशांनी भारताकडे अशा नजरेने बघितले आहे.

जगती समानतेचे संदीप लावणारे
हे संविधान आहे, मानव्य मानणारे
स्वातंत्र्य, बंधुतेचा झेंडा उभा धरोनी
समताप्रकाश दावी, न्यायास जागणारे
राजा कुणी ना येथे, कोणीच रंक नाही
शास्ते स्वत: स्वत:चे, नियमात वागणारे
दिसतो जरी निराळे आराधनेत आम्ही
ही संस्कृती अभिन्न, दुनियेस सांगणारे
आहे अखंड; राहो..., हा भारती नकाशा
सेतू–हिमालयाचा मनबंध बांधणारे
गणराज्य भारताचे राहो अनंत कीर्ती

उद्‌घोष हे निनादो, आकाश भेदणारे.[४]

विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे अध्यक्ष तसेच मानवतावादाचा पुरस्कार करणारे कवी प्रसेनजीत गायकवाड आपल्या उद्‌घोष या कवितेच्या माध्यमाने एकप्रकारे संदेश देतात, जगती समानतेचे संदीप लावणारे हे आपले संविधान आहे, ते मानवीमुल्य जपणारे, मानणारे आहे. यात राजा कुणी ना येथे, कोणीच रंक नाही. एवढेच नाही तर शास्ते स्वत: स्वत:चे नियमात वागणारे आहोत. आम्ही दिसतो जरी निराळे आराधनेत आम्ही ही संस्कृती अभिन्न, दुनियेस सांगणारे असे आहोत आम्ही. अनेकतेत एकता हाच अमुचा परम ब्रिदघोष आहे.

**निष्कर्ष:—**

१. जागतिकीकरण ही एक संमिश्र अशी संकल्पना आहे.
२. जागतिकीकरणाचा दुहेरी अंगाने जगावर प्रभाव पडलेला आहे.
३. ही एक सक्षम देशांनी लादलेली लाट आहे.
४. आंबेडकरवादी कविंनी सर्वसामान्य माणसाच्या नजरेतून जागतिकीकरणाचे चित्रण केले.
५. जागतिकीकरण साधकांसाठी संधी आहे, असा पण सूर निघतो आहे.

**संदर्भ सूची:—**

१. संपादक डॉ. सतिश चहांदे व प्रा. के. व्ही. तरासे, दलित कवितेतील नवे प्रवाह, प्रकाशक कला व विज्ञान महाविद्यालय, पुलगांव. मलपृष्ठ.
२. हेमंतकुमार कांबळे, ‘गाव‘, शब्दसाधना भाग—१, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या बी. कॉम. प्रथम वर्षासाठी मराठी विषयाचे पाठ्‌यपुस्तक. पृष्ठ ७०.
३. तत्रैव. पृष्ठ ७१.
४. प्रसेनजीत गायकवाड, ‘उद्‌घोष‘, शब्दसाधना भाग—१, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या बी. कॉम. प्रथम वर्षासाठी मराठी विषयाचे पाठ्‌यपुस्तक. पृष्ठ १३१.